# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १५७/२००८/ दिनांक :

१) श्री. बबन तातोबा ढवळे,
मु.पो. योगेवाडी, ता. तासगांव अर्जदार
जि. सांगली.

२) श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, तक्रारदार प्रतिनिधी
मु.पो. जत, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंड्ल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता(संवसु)
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
ग्रामीण विभाग,
सांगली.

३) सहाय्यक अभियंता .
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.

उप विभाग क्र. १, तासगांव
जि. सांगली.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**<u>कोरम</u> :-** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



157 of 2008

श्री. बबन तातोबा ढवळे, रा. योगेवाडी, ता. तासगांव, जि. सांगली यांच्या गट क्र. ३७७ मध्ये ५ एचपीचे शेतीपंपाचे कनेक्शन पाहिजे आहे. दिनांक २४-९-२००३ रोजी अनामत रक्कम भरली आहे. तथापी अंतर्गत कक्षात दिनांक २७-१२-२००७ रोजी अर्ज करेपर्यंत व नंतरही जोडणी न दिल्याने कक्षाच्या उपाय योजनेने समाधान न झाल्याने ग्राहक गा-हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल (CGRF Kolhapur Zone) कडे ' अ ' फॉर्ममध्ये दिनांक ३१-३-२००८ रोजी अपिल दाखल केले. अपिल अर्ज दाखल करून घेतलेवर मंचाने नियमानुसार कार्यवाही सुरू केली. वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागितले. त्याचप्रमाणे अपिल प्रकरणी सांगली मंडल कार्यालयात दिनांक ८-५-२००८ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणीची तारीख व वेळ नक्की करून संबंधितांना तसे लेखी कळविले.

सुनावणीच्यावेळी ग्राहक वा प्रतिनिधी उपस्थित नव्हते. तथापी मंचाचे सदस्य सचिव यांना दूरध्वनीवरून प्रतिनिधीनी सुनावणीस उपस्थित राहता येत नसल्याचे कळविले व दाखल केलेला तक्रार अर्ज व इतर कागदपत्रांच्या आधारे निर्णय घ्यावा असे सूचित केले. वि.प.च्या वतीने सांगली अंतर्गत कक्षाचे नोडल ऑफीसर श्री. पी.जे. जेधे, कार्यकारी अभियंता (ग्रा) सांगलीचे श्री. डि.के.पाटील, सहाय्यक अभियंता तासगांव उप विभाग १ चे श्री. व्हनमोरे उपस्थित होते.

ग्राहकाचा तक्रार अर्ज, उभयतांनी दाखल केलेली कागदपत्रे, अंतर्गत कक्ष, सांगली यांचा निर्णय, सुनावणीच्यावेळेची कथने व सादर केलेली पत्रे याच्या आधारे तक्रारीचे स्वरूप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे आहे.

श्री. ढवळे यांनी आपल्या शेतात शेतीपंपासाठी ५ एचपी वीज पंप जोडणीसाठी अर्ज केला होता. त्यास अनुसरून दि. २४-९-२००३ रोजी ग्राहकाने अनामत रक्कम जमा केलेली आहे. तसेच दि. ३१-८-२००४ रोजी तपासणी अहवाल दिलेला आहे. तसेच जोडणी न मिळाल्याने ग्राहकाने प्रतिनिधीमार्फत अंतर्गत कक्षात तक्रार दाखल केल्याचे दिसून येते. सदर तक्रारीचा निर्णय अमान्य झाल्याने ग्राहकाने ' अ ' फॉर्ममध्ये तक्रार केली आहे.

वि.प.ने आपल्या खुलाशात रोहित्राचे एच.टी. लाईन व एल.टी. एक्स्टेंशनचे काम असल्याने एक वर्षाचा कालावधी मिळावा अशी मागणी केलेली आहे. तसेच दिनांक ९–१–२००८ रोजी प्रत्यक्षदर्शी संयुक्त तपासणी अहवाल सादर केला आहे. सहाय्यक अभियंता, तासगांव उप विभाग १ यांनी दिनांक १५–५–२००८ पूर्वी सर्व कामे पूर्ण करून जोडणी देत असल्याचे आपल्या पत्रात नमूद केले आहे.

कक्षाने निर्णय घेतांना जी सुनावणी घेतली त्यावेळी कार्यकारी अभियंता (ग्रा) सांगली हे वि.प.तर्फे उपस्थित असल्याचे दिसून येते. निर्णयामध्ये अचुकपणा दिसून येत नाही.

सर्व कागदपत्रे, कथने याचा एकत्रित विचार करता मंचाने खालील निष्कर्ष नोंदविले आहेत.

ग्राहकाने दि. २४–९–२००३ रोजी अनामत रक्कम भरलेली दिसते. तसेच दि. ३१–८–२००४ रोजी तपासणी अहवालही दिलेला आहे. तथापी अंतर्गत कक्षात अर्ज करेपर्यंत म्हणजे दि. २७–१२–२००७ पर्यंत वीज जोडणी का झाली नाही याचा वि.प.कडे पाठपुरावा केलेला दिसून येत नाही. तसेच आपल्याकडे ग्राहकाने शेतीपंपासाठी वीज जोडणी मागितली आहे व ग्राहकाने अनामत रक्कमही भरूनही बराच काळ लोटला आहे. त्यावर कोणती कार्यवाही केली अगर कसे याचा खुलासा केला नाही. ग्राहकाने अर्ज केल्यावरच सर्व धावपळ झालेली आहे असे मंचाचे मत आहे.





ग्राहकाकडून दिनांक २९–४–२००३ रोजी रक्कम भरून घेतली. त्यावेळी कामाचे एस्टीमेट कसे केले होते व नंतर त्यात काय बदल केला ? व बदल का केला ? यांचे स्पष्टीकरणही वि.प.ने केलेले नाही. कक्षानेही त्या बाबत वि.पकडे विचारणा केलेली नाही किंवा आपल्या निकालपत्रात त्यचा ऊहापोह केलेला नाही. कक्षाने साचेबंद पण स्पष्ट आदेश न दिल्यानेच ग्राहकास अपिल दाखल करावे लागले आहे. विद्युत अधिनियम २००३ कार्यान्वीत झाल्यावर तरतुदीप्रमाणे राज्य वीज आयोगाला जे अधिकारी मिळाले त्या अधिकाराचा वापर करूनच अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष स्थापनेसाठी वितरणा कंपनीस सूचना दिलेल्या होत्या. त्यास अनुसरूनच कंपनीने सदरची व्यवस्था केलेली आहे, जेणेकरून व्यवस्थेत सुधारणा होईल व ग्राहकास न्याय मिळेल. पण प्रत्यक्षात तशी कार्यवाही होतांना दिसत नाही. म्हणून सविस्तर खुलासा करावा लागत आहे याची गंभीरपणे कक्षाने दखल घ्यावी. कार्यकारी अभियंता (ग्रा) सांगली यांनी पत्र क्र. ४८२४ दिनांक ५–५–२००८ च्या पत्रात लघुदाब वाहिनीचे काम शिल्लक असून सदरचे काम मुदतीत पूर्ण करून वीज जोडणी देणेत येत आहे अशा आशयचे पत्र दिले आहे. वास्तविक दिनांक २९–४–२००३ ला रक्कम भरून होवून इतका काळ लोटला तरी अद्यापी काम पूर्ण व्हावयाचे आहे हे नमूद करणेच खेदजनक आहे. उप विभागाने संयुक्त तपासणी अहवाल सादर केला आहे. त्यातील तपशिल पाहता अंदाजपत्रक एसपीएआय/३२/०२–०३ लाच मंजूर केल्याचे तसेच २ सिमेंट पोल वाहतूक केल्याची नोंद आहे. विद्युत पंप बसविला आहे. विद्युत संचाची मांडणी केलेली आहे. इत्यादी नोंदी महत्वाच्या आहेत. त्यावर ग्राहकासह, साक्षीदार, व शाखाधिकारी व सहाय्यक अभियंता यांच्या सह्या आहेत. ग्राहकाकडून सर्व तजवीज होवून अंदाजपत्रकही ०२–०३ साली मंजूर होवूनही वाहिनी व जोडणी कार्यान्वीत होत नाही हे अयोग्य आहे. सहाय्यक अभियंता, तासगांव उप विभाग १ यांनी आपल्या दिनांक ८–५–२००८ च्या पत्रात परत १ वर्षाच्या कालावधीचा उल्लेख केलेला आहे व तक्रारदाराच्या मागणीनुसार

कामाचा फेर आढावा घेवून काम हाती घेतले आहे ही विधाने गोंधळ निर्माण करणारी आहेत. ग्राहकाच्या मागणीनुसार वि.प. कसा काय बदल करू शकते हे समजून येत नाही. तसेच विलंब कालावधी माफ व्हावा याही मागणीकडे लक्ष देता येत नाही. लघुदाब वाहिनी उभी करण्यासाठी लागणारा कालावधी व अर्जाची पूर्तता झालेची तारीख या सर्व बाबींचा विचार करता दंडात्मक कारवाई होणे उचित आहे असे मंचाचे मत आहे. २० जानेवारी २००५ विनियम मंजूर (वितरण परवानाधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण २००५) झालेपासून प्रत्येक आठवड्यास रू. १००/– प्रमाणे दिनांक १५–५–२००८ पर्यंत दंडात्मक कारवाई करावी असे मंचाचे स्पष्ट मत आहे. सदर काळात जे कर्मचारी अगर अधिकारी कार्यरत असतील त्यांची चौकशी करून कंपनीने सदरचा दंड वसूल करावा. मात्र तत्पूर्वी सदरची रक्कम कंपनीने ग्राहकास अदा करावी. सर्व बाजूनी विचार करता मंच खालील आदेश पारित करीत आहेत.

## आदेश

१) अंतर्गत कक्ष, सांगली यांनी दिलेला निर्णय क्र. १४९७ दिनांक २६–२–२००८ रद्द करणयात येत आहे.

२) २० जानेवारी २००५ ते १५–५–२००८ या कालावधीसाठी प्रत्येक आठवड्यात १०० रूपये प्रमाणे आठवडे १७२ चे रू. १७२००/– इतकी रक्कम ग्राहकास कंपनीने अदा करावी व नंतर संबंधितांकडून वसूल करावी.





३) सदर आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी व ती केलेची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ कलम ८–७) च्या तरतुदीनुसार मंचास कळविण्यात यावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपिल करावयाचे असल्यास आदेशाच्या तारखेनंतर ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल, बांद्रा– कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई– ५१ याजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

(एस.आर.बांबळे)
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर